# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 23/01/2021 (शनिवार)

(सायंकाळ)

---

### आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीविरूद्ध कार्यवाही

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 12 कि.मी. अंतरावर 14 मैल येथे दिनांक 12/02/2020 चे 15.15 वा. पुर्वीपासुन आरोपी नामे– कु. साक्षी उर्फ सरोज ईश्वर मेसरे, वय 21 वर्ष, रा. पवार लेआउट कारला रोड वर्धा व मृतक नामे– प्रणय देवीदास मोरे, वय 26 वर्ष, रा. जुनी म्हाडा कॉलनी वर्धा जि. वर्धा, ह. मु. सी/ओ सुनील बोरकर रा. चौदा मैल यांचे घरी किरायाने यांचे दोन तीन वर्षा पासून प्रेम संबेध होते. यातील आरोपी हिचे सहा महीन्यापुर्वी दुसऱ्या मुलासोबत प्रेम संबंध जुळले ही गोष्ट मृतकला माहीत झाल्याने तो चिंतेत होता. मृतकने आरोपीला याबाबत वांरवार समजविले परंतु ती मृतकचे ऐकत नव्हती. यावरून मृतक मानसिक तनावात होता वरील नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद मृतकने आरोपीचे हजेरीत त्याचे किरायाचे घरी दोघेच हजर असतांना रूमचे सिलींग फॅनला तारेने गळफास लावुन आरोपीचे समक्ष आत्महत्या केली. मृतकचे सुसाईड नोट व मर्ग क्र. 11/2020 कलम 174 जा. फौ. चे चौकशीत आरोपी हीने मृतकला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचे निष्पन्न झाले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा चंद्रशेखर सावध यांचे रिपोर्ट वरुन व मर्गच्या तपासात आरोपी कारणीभूत असल्याचे निष्पन्न झाल्यावरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी विरुध्द कलम 306 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. संतोषसिंग ठाकुर 9422884815 हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत 32 कि. मी. मौजा राजोला राहते घरी येथे दिनांक 22/01/2021 चे 18.00 वा. दरम्यान श्रीमती अंतकला संतोष वंजारी(मृतक), वय 40 वर्ष, रा. राजोला हि सकाळी 9.00 वा. मिरची तोडायला शेतात गेली होती व 17.30 वा. घरी परत आली व 18.00 वा. दरम्यान स्वतःचे घरी ती खाली जमिनीवर पडली. तिला सामान्य रूग्णालय साळवा येथे नेले असता येथील डॉक्टरांनी पिएचसी. कुही येथे नेण्यास सांगितले असता पी.एच.सी कुही येथील वैद्यकिय अधीकारी यांनी ती मरण पावल्याचे घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अंकुश झिबल वंजारी, वय 41 वर्ष, रा. राजोला यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार मधुकर सुरपाम हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर